Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
UGC Approved Sr.No.64259
Vol - IV Issue-XI NOVEMBER 2017 ISSN 2349-638x Impact Factor 3.025

एम.एन.रॉय - भारतीय साम्यवादी विचाराचे मुख्य प्रवर्तक

प्रा. डॉ. प्रमोद जी. शिंदे
सहाय्यक प्राध्यापक
दयानंद विधी महाविद्यालय, लातूर

प्रास्ताविक :

मानवेन्द्रनाथ रॉय यांना आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत म्हणून ओळखले जाते. त्यांनी नवमानवतावाद या नवीन विचारसरणीची मांडणी केली. रॉय यांच्या राजकीय विचाराची सुरुवात मार्क्सवादापासून ते नव मानवतावादपर्यंत झाली आहे. भारतात मार्क्सवादी विचाराची सुरुवात रॉय यांच्या योगदानातून झाली आहे. नतंरच्या कालखंडात रॉय यांनी मार्क्सवादापासून फारकत घेतली. व्यक्तीस्वातंत्र्य व विवेकशील नैतिकता यावर आधारित मानवतावादी समाज हे त्यांच्या विचाराचे अधिष्ठान होते. त्या दृष्टिकोनातून मार्क्सवादात काही सुधारणा सुचविल्या आहेत.

रॉय यांचा राजकीय विचार : रॉय यांच्या राजकीय विचाराचे मुख्यत: तीन टप्पे पडतात.

१) पहिला टप्पा :

पहिला टप्पा १९०२ ते १९१५ जहाल राष्ट्रवादी विचाराचा. या काळात ते बाप्पा जतीन यांच्या नेतृत्वाखालील गुप्त संघटनेचे सदस्य होते. या काळात भूमिगत क्रांतीकारी चळवळीत त्यांनी भाग घेतला. राजकीय विचारात ते फारसे योगदान या काळात देऊ शकले नाहीत.

२) दुसरा टप्पा :

१९१५ ते १९४६ हा त्यांच्या राजकीय विचारातील मार्क्सवादी कालखंड म्हणता येईल. मेक्सिकोत असताना ते समाजवादी विचारांकडे आकर्षित झाले आणि पुढे ते मार्क्सवादी विचाराचे, लेनिन व स्टॅलिन यांचे खंद्ये पुरस्कर्ते म्हणून ओळखले गेले. त्यांनी आंतराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीत भाग घेतला. त्या काळात त्यांनी वासाहतिक देशातील क्रांतीच्या समस्या बाबत विचार सांगितले. भारतातील राजकीय वास्तव आणि दुसऱ्या महायुद्धाच्या शेवट यातून साम्यवादावरचा त्यांचा विश्वास कमी होत गेला आणि मग त्यांच्या राजकीय विचारातील तिसरा टप्पा सुरु होतो.

३) तिसरा टप्पा :

या काळात रॉय हे हळूहळू मार्क्सवादी विचाराच्या प्रभाव क्षेत्रातून बाहेर पडले आणि नव-मानवतावाद ही त्यांनी राजकीय विचाराला दिलेली महत्त्वाची देणगी ठरली. पुढे रॉय यांच्या या विचारास बौद्धिक अनुयायी वर्ग लाभला. शिक्षण व बौद्धिक विचाराद्वारे पक्षनिरपेक्ष कार्य करुन नविन सामाजिक क्रांती घडवून आणण्याचे ध्येय निर्धारीत केले गेले.

रॉय यांचा भारतीय संदर्भात मार्क्सवादी अभ्यास :

१९३० च्या काळात रॉय यांनी भारताच्या संदर्भात मार्क्सवादी विचाराचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी 'Indian transition' नावाचे पुस्तक लिहिले आहे. भारतात भांडवलदार वर्गास महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. त्यामुळे सरंजामशाहीचा अस्त झाला आहे. असे विचार त्यांनी या पुस्तकात मांडले. भारतात कामगारवर्ग हाच खरा

क्रांतीकारक वर्ग आहे. कामगारवर्गाने भांडवलदार वर्गाच्या विरोधी क्रांती केली पाहिजे असे आपले विचार प्रकट केले आहेत.

मार्क्सवादाच्या प्रभावाखाली माणसाचा अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून व समाजाचा वर्गविग्रहाच्या दृष्टीने त्यांनी विचार केला. भारतीय समाजातील वेगवेगळ्या वर्गाचे स्थान आणि भूमिका त्यांनी अधोरेखित केली. तसेच क्रांतीच्या मार्गात आर्थिक प्रेरणाही शोधण्याचा प्रयत्न त्यांनी केला. रॉय यांनी भारतातील राष्ट्रीय चळवळीची मार्क्सवादी मीमांसा केली आहे. त्यांच्या मते भांडवलशाहीच्या विकासाबरोबरच येथील राष्ट्रीय चळवळीला चालना मिळाली आहे. त्यामुळे भारतातील राष्ट्रीय क्रांती सर्व श्रमिक वर्गांच्या आर्थिक, राजकीय व सामाजिक क्रांतीशिवाय पूर्ण होऊ शकत नाही आणि कामगारवर्गच खरे क्रांतीचे वाहक ठरु शकतात.

रॉय यांचे मार्क्सवादी संदर्भात दोन महत्त्वाचे विचार आहेत. एक म्हणजे वासाहतिक क्रांती बद्दलचा रॉय यांनी मांडलेला विचार. कारण, वासाहतिक समाजातील साम्राज्यवादविरोधी शक्ती कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखाली काम करत असतील तरच त्या खऱ्या अर्थाने क्रांतिकारक समाज स्थापन करतील. कॉमिन्टर्नने वसाहतिक देशात औद्योगिक कामगार व गरीब शेतकरी यांचे संघटन करुन साम्यवादी पक्षांची बांधणी केली पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले. माणूस हा केवळ आर्थिक प्रेरणेनेच कर्यान्वित होत असतो. आर्थिक हितरक्षण हाच त्याच्या प्रत्येक प्रयत्नाचा हेतू असतो. या मार्क्सवादी धारणेमुळे रॉय यांचे राष्ट्रवादाच्या शक्तीप्रवाहाकडे दुर्लक्ष झालेले आढळते असे मत भा.ल. भोळे यांनी व्यक्त केले आहे.रॉय कामगार वर्गाद्वारेच भारतात क्रांती होऊ शकेल असे सांगतात. परंतु त्या कालखंडात कामगारवर्ग तेवढा विकसित झालेला नव्हता.

चौसाळकर यांनी गांधी आणि काँग्रेस यांच्या बद्दलची रॉय यांची भूमिका सांगितली आहे. ते म्हणतात भारतीय राष्ट्रीय चळवळ व म.गांधी साम्राज्यवादविरोधी जी लोकशाही चळवळ करीत होते त्यांतील पुरोगामी बाजू रॉय यांनी लक्षात घेतली नाही. त्यामुळे भारतीय संदर्भात गांधी व काँग्रेस यांच्या भूमिका व स्थान त्यांनी व कम्युनिस्ट पक्षाने नीट समजून न घेतल्यामुळे कम्युनिस्ट चळवळीचा तोटा झाला आहे.

रॉय यांनी राजकीय जाणिवा प्रगल्भ करुन लोकांना अधिक कृतिप्रवण करण्यासाठी 'रेनसां मुव्हमेंट' नावाची योजना आखली. या योजनेद्वारे बौद्धिक व तत्त्वज्ञानात्मक जडण-घडण करण्याचा प्रयत्न त्यांनी सुरु केला होता. समकालीन भारतीय परिस्थितीचे नीट आकलन करण्यासाठी युरोपातील प्रबोधनाचा अभ्यास करणे गरजेचे आहे असे त्यांनी प्रतिपादन केले. राजकीय स्वातंत्र्य व सामाजिक प्रगती घडवून आणावयाची असेल तर या देशात प्रबोधन घडून आले पाहिजे आणि त्याद्वारे भारताच्या सांस्कृतिक वारशाचे परीक्षण रॉय यांनी केले आहे. रॉय यांच्या प्रबोधन चळवळीने भारतीय बुद्धीजीवी वर्गाला राजकारणातुन तत्त्वज्ञानाच्या उच्चपातळीवर विचार करायला लावले.

रॉय काही काळ काँग्रेस पक्षात सामील झाले. पं.नेहरु व काँग्रेसमधील डाव्या गटांशी त्यांनी जवळीकता साधण्याचा प्रयत्न केला. काँग्रेसचे संसदीय राजकारण त्यांना मंजूर नव्हते. त्यांनी म.गांधीच्या नेतृत्वाला आव्हान देण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर रॉय हळूहळू काँग्रेसमधून बाहेर पडण्याचा प्रयत्न करु लागले. त्यांनी गांधीप्रणीत राष्ट्रवादी विचारसरणीस विरोध केला. रॉय यांनी फॅसिझमच्या विचारप्रणालीस विरोध केला. त्यासाठी त्यांनी ब्रिटिश शासनास सहकार्य दिले. गांधीवादाची तुलना त्यांनी फॅसिझमशी केली.अशाप्रकारे रॉय यांनी युद्धकाळात काँग्रेसवर मोठ्या प्रमाणावर टीका केली.

डिसेंबर १९४० मध्ये त्यांनी 'रॅडिकल डेमॉक्रॅटिक पक्षाची' स्थापना केली. त्यानंतर त्यांनी लोकांसाठी लोकांची योजना तयार करुन भारतासाठी अधिक लोकशाही प्रजासत्ताकाची संकल्पना मांडली. हळुहळू ते मार्क्सवादी विचारापासून फारकत घेऊ लागले. व्यक्तीस्वातंत्र्यावर आधारित नव-मानवतावादाचे नवचैतन्य निर्माण करणारे तत्त्वज्ञान त्यांनी मांडण्यास सुरुवात केले. मानवास देखील एक स्वतःचे अंगभूत विचार करण्याचे स्वातंत्र्य असते. जे

विवेकनिष्ठ असते असे ते तत्त्वज्ञान मांडू लागले. शास्त्रीय पद्धतीने मानवी नैतिकतेवर आधारित मानवाच्या शाश्वत विकासावर ते भर देऊ लागले. मानवमुक्तीच्या प्रश्नास त्यांनी आपल्या विचारात अग्रस्थान देऊन मानवी समस्यांची उकल ही मार्क्सवाद व संसदीय लोकशाहीच्या मार्गाने होत नाही असे आपले मत व्यक्त केले. त्यासाठी त्यांनी मुलग्राही मानवतावादी तत्त्वज्ञानावर भर दिला.

नव-मानवतावादाचे तत्त्वज्ञान विकसित करत असताना त्यांनी मार्क्सवादी विचारांची समीक्षा केली. ती आपणास पुढीलप्रमाणे सांगता येईल.

रॉयद्वारे मार्क्सवादी विचारांचे खंडण :-

रॉय हे जडवादी तत्त्वज्ञ म्हणून ओळखले जातात. जडवादी तत्त्वज्ञान हे विवेकनिष्ठांवर आधारित असते. त्यामुळे मानवाच्या खुळचट विचारापांसुन मुक्त करण्याचे कार्य जडवादी
तत्त्वज्ञानाद्वारे केले जाते. त्यामुळे त्यांनी मार्क्सच्या द्वंद्वात्मक भौतिकवाद खऱ्या अर्थाने भौतिकवाद नसून तो जुन्या शास्त्रीय संशोधनावर आधारित आहे असे प्रतिपादन केले.

मार्क्सचा भौतिकवाद हा हेगेलच्या प्रभावाखाली विकसित झालेला आहे. त्यामुळे मार्क्सच्या विचारात व्यक्तीस्वातंत्र्य, स्वतंत्र मानवी अस्तित्व, विचार आणि माणसाची सर्जनशीलता यांना दुय्यमत्त्व प्राप्त झाले आहे. मार्क्सने आर्थिक नियतीवादाचा सिद्धांत मांडला. त्याद्वारे आर्थिक रचनेमुळे समाजात मूलभूत परिवर्तन होते आणि विचारप्रणाली, राज्यव्यवस्था, तात्वीक विचार, धर्मसंस्था इत्यादी ते साह्यभूत ठरतात. अशारीतीने मार्क्सने आर्थिक घटकांकडे जास्त लक्ष दिल्यामुळे मानवी स्वतंत्र अस्तित्वाकडे डोळझाक केली. त्यामुळे मार्क्सने विचारांची स्वायत्ताकडे लक्ष दिले पाहिजे असे रॉय यांचे मत आहे.

मार्क्सचे इतिहासाबद्दलचे विश्लेषण हे अर्धसत्य आहे असे रॉय यांचे मत होते. कारण मार्क्स अनावश्यकतेपेक्षा जास्त मानवी विकासात वर्गसंघर्षास महत्त्व देतो. समाजातील वर्गीय विभाजन पाया आणि इमारतीतील आर्थिक संबंधामुळे होते. समाजाचा विकास केवळ वर्गसंघर्षातून घडत नसतो. तर वर्गीय सहकार्य देखील महत्त्वाचे असतात. त्यामुळे मानवी विकासात खरा हातभार वर्गीय सहकार्यावर आधारीत असतो. त्यामुळे सामाजिक विकास हा केवळ वर्गसंघर्ष नसून वर्गसहकार्याचा असतो. यावरुन मार्क्सचा वर्गसंघर्षाचा सिद्धांत भ्रामक आहे असे सांगतिले गेले.

मार्क्सचा वर्गसंघर्षाचा सिद्धांत अतिरिक्त मुल्याच्या सिद्धांवर आधारित आहे. अतिरिक्त मुल्यामुळे मानवी प्रगती साधली गेली असे मार्क्सचे मत आहे. परंतु मार्क्स सामाजिक अतिरिक्त मुल्यामुळे कामगारांचे शोषण होत असते असे म्हणतो. त्यामुळे समाजाला एक वर्ग अतिरिक्त मुल्यावर नियंत्रण स्थापित करत असेल तर हे बरोबर नाही असे रॉय यांना वाटते. समाजसत्त्वादी राज्यात अतिरिक्त मुल्यांवर नवसत्ताधारी कामगारवर्गाचे नियंत्रण असते. रशियासारख्या देशात मोठ्या प्रमाणावर अतिरिक्त मुल्य पैदा केले जाते. तेथे कामगारवर्गाचे अधिक प्रमाणावर शोषण केले जाते. म्हणून अतिरिक्त प्रश्न ज्याप्रकारे मार्क्सने प्रकट केला, तो त्याप्रकारे प्रकट करावयास नको होता. असे रॉय यांना वाटते.

रॉय यांनी मार्क्सचे मध्यमवर्गीय संकल्पनेद्वारे खंडन केले आहे. कारण मार्क्सने मध्यमवर्गीयास कमी लेखून त्याची क्रांतीविरोधकांत गणना केली. भांडवल व श्रमाच्या आंतरक्रियेतून मध्यमवर्गाची वाढ होते. मध्यमवर्ग हा प्रस्थापित वर्गाच्या विरोधात असून, समाजवाद ही त्याची विचारसरणी आहे असे मानले जाते. परंतु मार्क्सच्या पारंपरिक अनुयायांनी मध्यमवर्गाच्या क्रांतीकारक भूमिकेकडे दुर्लक्ष केले. कामगारवर्गास क्रांतीची प्रेरणा ही मध्यमवर्गीशिवाय मिळू शकत नाही. कामगारवर्ग हा बौद्धिक व सांस्कृतिक दृष्ट्या मागासलेला असतो. त्यामुळे मध्यमवर्गीविषयी मार्क्सने चुकीचे भाकित केले आहे असे रॉय यांना वाटते.

रॉय यांना मार्क्सची राज्यक्रांतीची कल्पना मान्य नाही. फ्रेंच राज्यक्रांती ही लष्करी उठावावर आधारित होती. आता अशा उठावाद्वारे क्रांती शक्य नाही. कारण राज्यसंस्थेचे स्वरुप झपाट्याने बदलत चालले आहे. पूर्वीपेक्षा अधिक सदृढ आणि गुंतागुंतीचे मार्ग योग्य आहे. कारण प्रस्थापित समाजिक व्यवस्थेत पुर्नबदल करणे गरजेचे असते. त्यासाठी सशस्त्र क्रांतीच्या ऐवजी सहमतीवर आधारित लोकक्रांती झाली पाहिजे.त्यासाठी साध्य-साधन सुचितेचा विचार रॉय यांनी मांडला. रॉय यांनी मार्क्सच्या राज्यविषयक विचारावर टीका केली आहे. मार्क्सच्या मते साम्यवादी समाजात राज्यसंस्था विरुन जाईल हे विचार चूकीचे आहे. कारण जोपर्यंत सुसंस्कृत मानवी समाज आहे तोपर्यंत राज्यसंस्था नष्ट होत नाही. त्यामुळे राज्यविहिन वर्गविहिन समाजव्यवस्था अस्तित्वात येणार नाही. असे रॉय यांना वाटते. रॉय यांनी चीन, रशिया येथील राज्याच्या अस्तित्वाचे उदाहरणे दिली आहेत. त्याठिकाणी अधिक काळ साम्यवादी पक्ष सत्तेवर असून देखील राज्यसंस्था नष्ट झाली नाही. त्यामुळे साम्यवादी विचारांशी सुसंगत अशी राज्यव्यवस्था अस्तित्वात असते. त्यावर कामगारवर्गाची हुकुमशाही कामय राहते. सामाजिक परंपरा आणि सांस्कृतिक सुधारणेस महत्त्व देऊन त्यावर आधारित सामाजिक क्रांती केली पाहिजे असे रॉय यांना वाटते. त्यामुळे त्यांनी कम्युनिस्ट पक्षास कडाडून विरोध करुन संसदीय लोकशाहीस मानवाच्या सर्वांगीण विकासाठी मूलग्राही लोकशाही व नवमानवतावादी तत्त्वज्ञानाचे प्रतिपादन केले. ते पुढीलप्रमाणे सांगता येईल.

रॉयप्रणित नवमानवतावादाचे तत्त्वज्ञान :

रॉय यांनी नवमानवतावादाची मूळ प्रेरणा ही एंगेल्सच्या लेखनातून विशेषत: भौतिकवाद, जीवशास्त्रीय उत्क्रांती व ज्ञानविषयक सिद्धांत आदि लेखनातून मिळाली आहे. हॉब्ज, हेगेल आदींचा प्रभाव देखील त्यांच्यावर होता. या सर्वांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न त्यांनी केला. नवमानवतावादी तत्त्वज्ञानाच्या गाभ्याचे सूत्र म्हणजे मानवी स्वातंत्र्य आणि सत्याचा शोध घेण हे मानवी जीवनाचे उद्दिष्ट्ये असते. रॉय यांचा भौतिकवाद द्वंद्ववादावर आधारीत नव्हता. मानवी संघर्ष हा निसर्गाशी होता. हा संघर्ष मानव स्वत:च्या अस्तित्वासाठी करीत असतो. अस्तित्वाचा संघर्ष हा स्वातंत्र्याचा संघर्ष म्हणून ओळखला जातो. त्यातूनच तो आशयसंपन्न व अर्थपूर्ण जीवन जगतो. सत्य, ज्ञान व स्वातंत्र्य या आधारे मानव आपले अस्तित्व टिकवित असतो. रॉय यांचा भौतिकवाद व्यक्तीस दैव, नियती व ईश्वर यांच्या गुलामगिरीतून मुक्त करतो.

रॉय यांच्या मते प्रत्येक मानव विवेकी असतो, तो स्वत:च्या व्यक्तिमत्वामध्ये निहित विवेक आणि बुद्धिवाद याबाबत जागरुक असतो. त्याला सामाजिक जबाबदारीची जाणीव असते. त्यातूनच मानवी जीवनाला यथार्थ अर्थ प्राप्त होत असतो आणि त्यातूनच स्वातंत्र्याची कक्षा रुंदविण्याचा प्रयत्न करत असतो. साम्यवादी आणि फॅसिस्ट, वर्ग व राष्ट्र यांना व्यक्तीपेक्षा अवास्तव महत्त्व दिले जाते. त्यामुळे दोन्ही ही विचारसरणी व्यक्तीपेक्षा समष्टीला जास्त महत्त्व देतात. कम्युनिस्ट वर्ग तर फॅसिस्ट राष्ट्रास महत्त्व देतात. दोन्ही विचारसरणी व्यक्तीस्वातंत्र्याच्या विरोधी आहेत. त्यामुळेच रॉय यांचा मानवतावादी तत्त्वज्ञान हे मूलग्राही मानवतावादी आहे. कारण तो नविन वैज्ञानिक संशोधनाद्वारे आणि ऐतिहासिक अनुभवातून साकार झालेला आहे.

साम्यवादी राजवटीत कामगारवर्गाची हुकुमशाही प्रस्थापित झालेली असते. या राजवटीत सत्ता काही व्यक्तींच्या हातात केंद्रीत झालेली आहे. त्यामुळे व्यक्तीस्वातंत्र्यास बाधा निर्माण झालेली आहे. संसदीय व्यवस्थेत भांडवलशाहीमुळे असमानता फोफावलेली असते. त्यामुळे राजकीय पक्ष व निवडणूक यामुळे लोकशाहीस खरा अर्थ प्राप्त होत नाही. त्यामुळे रॉय यांनी मुलग्राही लोकशाहीचा (रॅडिकल डेमॉक्रसी) पुरस्कार केला. रॅडिकल डेमॉक्रसी ही जास्तीत जास्त लोककेंद्री बनते. त्यामध्ये सत्तेचे विकेंद्रीकरणावर भर असतो. प्रत्यक्ष लोकशाहीची यंत्रणा म्हणून ती काम करीत असते. त्याद्वारेच राज्याच्या अमर्याद सत्तेवर मर्यादा व नियंत्रण स्थापित केले जाते. राजकीय सत्ता ही समाज नियमनासाठी व

व्यवस्थापनासाठी वापरली पाहिजे. त्यासाठी राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण आवश्यक आहे. त्यातूनच खऱ्या अर्थाने व्यक्ती जास्तीत जास्त स्वातंत्र्याचा उपभोग घेतील असे रॉय यांचे मत होते.

रॉय यांनी पक्षाच्या भूमिकेबद्दल आपले मत व्यक्त केले आहे. पक्षाद्वारे एक गट आपली सत्ता स्थापित करित असतो. त्यामुळे त्यांचे केंद्रीकरण न होता विकेंद्रीकरण झाले पाहिजे. पक्षाच्या भुमिकेमुळे जनसार्वभौमत्त्वास धोका पोहचता कामा नये. त्यासाठी रॉय यांनी आदर्श राजकीय व्यवस्थेचे स्वप्न पाहिले आहे. त्यासाठी स्वायत्त गणराज्य व्यवस्था निर्माण करण्यावर त्यांचा भर होता.

रॉय यांच्या आदर्श समाजाची कमान व्यक्तिहित व स्वातंत्र्यावर आधारित आहे. त्यासाठी रॉय यांनी आर्थिक पुर्नघटनेची मागणी केली. म्हणजेच उपयोगितासाठी उत्पादन व गरजेनुसार वितरण हे त्यातील मुख्य तत्त्व होय. नियोजन व नियमन यावर लोकसमितीचे नियत्रंण असेल. याचे योग्य असे पुर्नवाटप व्हावे यासाठी रॉय यांनी शिक्षणाला महत्त्व दिले. कारण सामाजिक बदलासाठी व्यक्तीची भूमिका महत्त्वाची आहे. शिक्षणाद्वारे व्यक्तीची भूमिका निर्धारित होत असते. याद्वारेच मुलग्राही लोकशाहीव्यवस्था निर्माण केली जी स्वार्थ, असमानता, शोषण, राष्ट्र-राज्य, वर्ग आदि बंधनापासून मुक्त असते. असा आशावादी विचार रॉय यांनी आपल्या नव-मानवतावादी सिद्धांतातून व्यक्त केला.

शेवटी काही टीकाकारांनी रॉय यांच्या मूलग्राही लोकशाही संकल्पनेवर आक्षेप घेतला आहे की खऱ्या अर्थाने ही लोकांची लोकशाही असेल का ? लोकसमित्या देखील त्यावर आपले वर्चस्व प्रस्थापित करतील. या देखील पक्षीय राजकारणापासून मुक्त नसतील. पक्षविहीत राजकाराणातून अराजकता वाढेल जे कदाचित सर्वाधिकारशाहीस पोषक वातावरण तयार करेल. अशा अनेक टीका जरी होत असल्या तरी रॉय यांच्या सिद्धांताद्वारे त्यांची बौद्धिकतेची जाणीव नक्कीच आपणास होईल. या तत्त्वज्ञानाद्वारे रॉय यांनी सृजनशील मानव कसा निर्माण करता येईल यावर अधिक भर दिला गेला. त्यामुळे रॉय यांना खरोखर भारतीय साम्यवादाचे मुख्य प्रवर्तक म्हणून ओळखले जाते यात काही दुमत नाही.

संदर्भ - ग्रंथसूची

1. Bairathi Shashi, 1987, Comunism and Nationalism in India, Anamika prakashan, Delhi
२. राय सत्या एम, २००९, भारत में उपनिवेशवाद और राष्ट्रवाद, हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली
३. Adhikari , G.,१९७१, Documents of the History of the communist party of India, vol.I., १९१७-२२
4. Karnik V.B., 1978, M.N.Roy - A Political Biography, Nav Jagriti Samaj, Bombay
५. Roy M.N., १९४३, Fascism : Its Philosophys practice, IInd Ed., Renais -Pub., Calcutta
६. Roy M,N, १९४७, New Humanism, a Manifesto Renaissance Pub., calcutta
७. Roy M,N., १९४६, New orientation : lectures delivered at political study camp held at Dehradun, from 8th to 18th , १९४६, forward by philip spruttm Renaissame Pub., Calcutta
८. Bhattacharya. G.P. , 1961, M.N, Roy and Radical Humanism, J.B.H. Wadia Pub., Bombay